माफसु

# यशोगाथा










# शेततळयातील मत्स्यशेतीचा व्यवसाय

श्री. महादेव मुसळे हे शेतकरी असुन त्यांच्याकडे चार एकर शेती असुन त्यात ते टमाटर, मिरची, वांगे, काकडी यासारख्या फळभाज्यांचे उत्पादन घेतात. त्यांच्या शेतामध्ये कृषी विभागाकडून २०१४ मध्ये १४ मी. ग ४ मी. आकाराचे शेततळे बांधण्यात आले. मत्स्यविज्ञान महाविद्यालयातील डॉ. ए.एस. कुलकर्णी, सहाय्यक प्राध्यापक यांच्याशी संपर्क साधुन त्यांनी त्यांच्याकडे शेततळयामध्ये मत्स्यशेती करण्याची इच्छा व्यक्त केली. तेव्हा त्यांच्या मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र शासनाच्या करडखेड जि. नांदेड येथील मत्स्यबीज केंद्रातुन मत्स्यबीज खरेदी करून त्यांनी त्याच्या शेततळयात संचयन करण्यात आले. संवर्धन काळामध्ये खत व खाद्य व्यवस्थापनाचे मार्गदर्शन त्यांना सतत करण्यात आले. शेततळयात पाण्याची साठवणुक केल्यामुळे मागील वर्षी दुष्काळी परिस्थितीवर मात करता आली.

शेततळयातील पाण्याचे योग्यपध्दतीने व्यवस्थापन केल्यामुळे लहान आकाराच्या शेततळयामधुन ५०० किलो मत्स्योत्पादनाद्वारे रू. ३०,०००/- इतके आर्थिक उत्पन्न मिळाले. मत्स्यपालन करतांना शेततळयामधील खतयुक्त पाण्याचा वापर फळबागाकरीता केल्यामुळे फळभाज्यांच्या उत्पादकतेवर चांगला परिणाम झाल्याचे त्यांना दिसून आले. मत्स्यशेतीचे योग्य व शास्त्रीय पध्दतीने व्यवस्थापन करून मत्स्योत्पादन वाढवण्यावर यावर्षीही भर देणार आहेत.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर अंतर्गत शेतकरी जागरूकता अभियान २०१६ मध्ये श्री मुसळे यांच्या शेतात राबविण्यात आले होते. या अभियाना अंतर्गत जवळपासच्या गावातुन आलेल्या अनेक शेतकऱ्यांना शेतीपुरक व्यवसायाचे मार्गदर्शन करण्यात आले. सोबत शेततळयातील मत्स्यपालनाचे प्रात्यक्षिकही दाखविण्यात आले. बॅंकेकडून आर्थिक सहाय्य मिळाल्यास मत्स्य शेतीसोबत कुक्कुटपालनाचा व्यवसायही 'एकात्मिक शेती' पध्दतीने करण्याचा श्री. मुसळे यांचा निर्धार आहे.

श्री. महादेव लिंबाजी मुसळे
मु. कोष्टगाव जि. लातूर ता. रेणापूर

मार्गदर्शक :
डॉ. ए. एस. कुलकर्णी, श्री. एस. एन. कुंजीर,
श्री. एम. एम. गिरकर,
सहाय्यक प्राध्यापक,
मत्स्यविज्ञान महाविद्यालय, नागपूर